**Two Days Workshop on " New Trends in Women's History "**


DR. BABASAHEB AMBEDKAR MARATHWADA UNIVERSITY AURANGABAD
DEPARTMENT OF HISTORY AND ANCIENT INDIAN CULTURE
NAAC Accredited A


Ref. No. BAMUH/2014/ Date: 15/09/2014

# स्त्रियांच्या इतिहासातील नवे प्रवाह

## कार्यशाळा,

## दिनांक १० व ११ ऑक्टोबर २०१४

प्रति,

------------------------------

------------------------------

महोदय,

विसाव्या शतकात इतिहास लेखन पद्धती मध्ये अनेक नवीन प्रवाह विकसित होत आहेत. त्यात, स्त्रीइतिहास लेखन हा अत्यंत महत्वाचा प्रवाह आहे. जो विद्यमान सर्व इतिहासाकडे स्त्रीवादी दृष्टीकोनातून पाहतो. स्त्रियांच्या संबधाने इतिहासाची मांडणी करतो. एकंदरीत जागतिकस्तरावर या इतिहासलेखनात अनेक नवीन शक्यता विकसित होत आहेत.

पारंपरिक इतिहास लेखनामध्ये स्त्री कायम अदृश्य राहिलेली आहे. स्त्रीवादी अभ्यासकांनी केलेल्या संकल्पनात्मक व पद्धती शास्त्रीय नवसृजनामधून इतिहास लेखनात स्त्रिया केवळ दृश्य झाल्या इतकेच नाही तर इतिहास लेखनविश्वात महत्वपूर्ण स्थित्यंतर झाले आहे. स्त्रीवाद्यांच्या अशा प्रयत्नातून स्त्रियांच्या इतिहास लेखनाचे नवनवीन आयाम पुढे आले आहेत. स्त्रीवादी इतिहास लेखनातील शोधाच्या नवीन वाटा संशोधकांना परिचित व्हाव्यात. त्यांना संकल्पनात्मक व पद्धतीशास्त्रीय हत्यारे प्राप्त व्हावीत. या अनुषंगाने इतिहास व प्राचीन संस्कृती विभाग डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ व प्रागतिक इतिहास परिषद व ताराबाई शिंदे स्त्री अभ्यास केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने स्त्रियांच्या इतिहासातील नवीन प्रवाहासंदर्भात १० व ११ आक्टोंबर २०१४ रोजी विद्या प्रबोधिनी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद येथे कार्यशाळेचे आयोजन केले आहे. या कार्यशाळेत सहभागी होणाऱ्या प्राध्यापकांना नोंदणी शूल्क २५० रु, व संशोधक विद्यार्थ्यांना १०० रु शूल्क आकारले जाईल.

तरी या कार्यशाळेत उपस्थित राहावे ही विनंती.

| सहसमन्वयक | सहसमन्वयक | समन्वयक |
|---|---|---|
| शैलेश राऊत | डॉ. चेतना सोनकांबळे | डॉ. पुष्पा गायकवाड |

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

**दिनांक: १०/१० /२०१४**

**विविध चळवळींमध्ये स्त्रियांचा सक्रिय सहभाग- व्ही गिथा**

औरंगाबाद दि.१०:- डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील इतिहास व प्राचीन भारतीय संस्कृती विभाग, ताराबाई शिंदे स्त्री अभ्यास केंद्र व प्रागतिक इतिहास परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने स्त्रियांच्या इतिहासातील नवे प्रवाह या विषयावर दोन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. चेन्नई येथील स्त्रीवादी अभ्यासिका व प्रख्यात लेखिका व्ही. गीथा यांच्या बीजभाषणाने सदरील कार्यशाळेला सुरुवात करण्यात आली. यावेळी व्यासपीठावर इतिहास विभागाचे विभागप्रमुख डॉ. उमेश बगाडे, ताराबाई शिंदे स्त्री अभ्यास केंद्राच्या संचालक डॉ. चेतना सोनकांबळे, कार्यशाळेच्या समन्वयक डॉ. पुष्पा गायकवाड, टाटा इन्सटीट्युट ऑफ सोशल सायन्सेस मुंबईच्या डॉ. वंदना सोनाळकर यांची उपस्थिती होती.

बीजभाषणात व्ही. गीथा म्हणाल्या की, स्त्रियांच अस्तित्व इतिहासात नेमकं काय आहे? आपल्याला माहित असलेल्या इतिहासात स्त्रिया होत्या, इथपर्यंत हे उत्तर मर्यादित नाही. जेव्हा स्त्रीवादी चष्म्यातून आपण बघतो त्यावेळी स्वातंत्र्य चळवळ, जातीअंत चळवळ, कामगार चळवळ, पर्यावरण विषयक चळवळ या सर्वांमध्ये स्त्रियांचा सक्रिय सहभाग राहिलेला आहे. सदरील चळवळींमध्ये स्त्रियांनी फार मोठ योगदान दिलेल आहे. चळवळीचे अवलोकन करताना फक्त एक विशिष्ट मुद्दा विचारात घेऊन चालत नाही तर जात, वर्ग, धर्म या अनुषंगाने सुध्दा चळवळीचा विचार होण गरजेचं आहे. स्त्रीवादी अभ्यासिका सांगतात की अडचणींच्या काळात (युद्ध किंवा नैसर्गिक आपत्ती) स्त्रिया मोठ्या प्रमाणात कार्यरत असतात. क्रांतिकारी कार्याला चालू ठेवण्यासाठी सुद्धा स्त्रिया मोठ्या प्रमाणत कार्यरत होत्या. तेलंगणा लढ्यातही स्त्रियांनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला तसेच बांगलादेशात घडलेल्या चळवळींमध्येही स्त्रियांचा सहभाग होता. स्त्रियांची भूमिका नेहमीच उत्पादक अशा स्वरुपाची असते .

दुसऱ्या सत्रात स्त्रीवादी इतिहास अध्ययन पद्धतीवर डॉ. वंदना सोनाळकर, स्वा.रा. ती. मराठवाडा विद्यापीठातील डॉ. दिलीप चव्हाण, तर स्त्रीविद्रोहाचे स्वरुप याविषयावर डॉ. उमेश बगाडे यांनी मार्गदर्शन केले.

(दि. ११) रोजी तिसऱ्या सत्रात डॉ. राधिका शेषन व प्रा. अनघा तांबे (पुणे विद्यापीठ) व प्रा.डॉ. रणजित परदेशी (धुळे) उपस्थितांना मार्गदर्शन करणार आहेत.

DIRECTOR
Tarabai Shinde Women's Studies Centre
Dr. Babasaheb Ambedkar Marathwada
University, Aurangabad

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

**दिनांक: ११/१०/२०१४**

औरंगाबाद दि.१०:- डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील इतिहास व प्राचीन भारतीय संस्कृती विभाग, ताराबाई शिंदे स्त्री अभ्यास केंद्र व प्रागतिक इतिहास परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने स्त्रियांच्या इतिहासातील नवे प्रवाह या विषयावर दोन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यशाळेचा (दि. ११) रोजी डॉ. उमेश बगाडे यांच्या अध्यक्षीय भाषणाने समारोप करण्यात आला. यावेळी व्यासपीठावर संचालक डॉ. चेतना सोनकांबळे व कार्यशाळेच्या समन्वयक डॉ. पुष्पा गायकवाड यांची उपस्थिती होती.

सदरील समारोप सत्रात ताराबाई शिंदे स्त्री अभ्यास केंद्राच्या संचालक डॉ. चेतना सोनकांबळे यांनी कार्यशाळेच्या आयोजनामागची भूमिका स्पष्ट केली त्या म्हणाल्या की, अशाप्रकारच्या कार्यशाळा स्त्री-पुरुष समताधिष्ठित समाज निर्मितीकरीता महत्वाच्या भूमिका बजावत असतात. वैयक्तिक जीवनात कुटुंब आणि समाजात वावरत असतांना स्त्री-पुरुष समतेचा फक्त विचार न घेता त्यादिशेने प्रत्यक्ष आचरणाची गरज असल्याचे त्यांनी नमुद केले. उच्च शिक्षित कुटुंबांमध्ये, मध्यमवर्गीयांमध्ये तसेच समाजात प्रत्येक ठिकाणी छोट्या-छोट्या गोष्टींमध्ये होणाऱ्या स्त्री-पुरुष भेदभावाची अनेक उदाहरणे त्यांनी नमुद केली.

प्रागतिक इतिहास परिषदेच्या वतीने डॉ. नारायण भोसले व डॉ. जगदिश सोनवणे यांनी परिषदेची भूमिका स्पष्ट केली तसेच परिषदेमार्फेत आयोजित करण्यात आलेल्या व येत्या काळात आयोजित करण्यात येणाऱ्या विविध उपक्रमाची माहिती उपस्थितांना दिली.

अध्यक्षीय समारोपात डॉ. बगाडे म्हणाले की, कुठल्याही लेखनाची चिकित्सा करणे गरजेचे असते. मात्र तत्कालीन समाजात उच्चवर्णीयांनी लिहिलेले धर्मग्रंथ व त्यांचे इतर लिखाण हे वैश्विक सत्य असते असा भ्रम निर्माण करण्यात आला. इतिहासात ताराबाई शिंदे, मुक्ता साळवे इ. स्त्रियांनी विविध धर्मग्रंथांमध्ये तसेच समाजामध्ये स्त्रियांविषयी होणाऱ्या भेदभावावर सडकून टिका केली आहे. सदरील इतिहासामध्ये स्त्रियांनी महत्वपुर्ण भूमिका बजावलेली आहे. स्त्रियांनी विविध जाती वर्ग, वर्ण, दास्यअंत चळवळींमध्ये स्त्रियांनी सक्रिय सहभाग नोंदवला आहे असेही ते म्हणाले. सदरील कार्यशाळेत विविध महाविद्यालयांच्या प्राध्यापकांनी तसेच विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग नोंदवला. स्त्रियांच्या इतिहासातील नवे प्रवाह या विषयावर विविध स्त्रीवादी अभ्यासकांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

या दोन दिवसीय कार्यशाळेच्या समारोप सत्राचे सुत्रसंचालन ललित भवरे यांनी केले तर प्रा. निर्मला जाधव यांनी आभार मानले.

DIRECTOR
Tarabai Shinde Women's Studies Centre
Dr. Babasaheb Ambedkar Marathwada
University, Aurangabad

New Trends In Women's History [10-11/10/2014]







